# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ०२ / २०१८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १७ / ०७ /२०१८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०२, शुक्रवार दिनांक २० / ०७ /२०१८.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( ड ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **शुक्रवार दिनांक २० /०७/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - २ शुक्रवार दिनांक २० / ०७ / २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता **अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे होणा-या **विशेष सभेची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| ०३ | **गाळेधारकांचे भाडे कमी करुन मिळणे बाबत...**<br><br>संदर्भ - १) सर्व गाळे धारक यांचे दिनांक १६/०७/२०१८ चे पत्र.<br>२) मा.श्री.बाळासाहेब बोराटे, मा.सौ.दिपाली नितीन बारस्कर, मा.श्री.योगीराज गाडे, मा.श्री.मुदस्सर शेख, मा.श्री.संजय शेंडगे, सर्व स्थायी समिती सदस्य,<br>३) श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे, सभागृह नेता, मा.श्री.अनिल बोरुडे उपमहापौर, मा.श्री.मनोज दुलम, मा.श्री.संजय शेंडगे, मा.श्री.बाळासाहेब बोराटे, मा.सौ.दिपाली बारस्कर, मा.सौ.उषाताई नलावडे, मा.सौ.अनिता राजेंद्र राठोड, मा.श्रीमती.कलावती शेळके, मा.श्री.मुदस्सर शेख, मा.श्री.संजयकुमार लोंढे, मा.श्री.बाबासाहेब वाकळे, मा.श्री.योगीराज गाडे, मा.सौ.मालनताई ढोणे, मा.सौ.सारिका भुतकर, मा.सौ.जयश्री बाबासाहेब सोनवणे, मा.सौ.छाया सुरेश तिवारी, मा.सौ.सुनिता फुलसौंदर, मा.श्री.दिलीप सातपुते, मा.श्री.सचिन तुकाराम जाधव, मा.श्री.अनिल शिंदे, मा.श्रीमती.प्रतिभा भांगरे, मा.सौ.आशा बडे, मा.श्री.दत्ता ह कावरे, सन्माननीय स्थायी समिती सदस्य व सदस्य, अहमदनगर महानगरपालिका यांचा दिनांक १६/०७/२०१८ चे पत्र. |
| ०४ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : १७ / ०७ /२०१८.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०३** **दिनांक : २० /०७/२०१८.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :- गाळेधारकांचे भाडे कमी करुन मिळणे बाबत...**

संदर्भ - १) सर्व गाळे धारक यांचे दिनांक १६/०७/२०१८ चे पत्र.

२) मा.श्री.बाळासाहेब बोराटे, सौ.दिपाली नितीन बारस्कर, मा.श्री.योगीराज गाडे, मा.श्री.मुदस्सर शेख, मा.श्री.संजय शेंडगे, सर्व स्थायी समिती सदस्य,

३) श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे, सभागृह नेता, मा.श्री.अनिल बोरुडे उपमहापौर, मा.श्री.मनोज दुलम, मा.श्री.संजय शेंडगे, मा.श्री.बाळासाहेब बोराटे, मा.सौ.दिपाली बारस्कर, मा.सौ.उषाताई नलावडे,मा.सौ.अनिता राजेंद्र राठोड, मा.श्रीमती.कलावती शेळके, मा.श्री.मुदस्सर शेख, मा.श्री.संजयकुमार लोंढे, मा.श्री.बाबासाहेब वाकळे, मा.श्री.योगीराज गाडे, मा.सौ.मालनताई ढोणे, मा.सौ.सारिका भुतकर, मा.सौ.जयश्री बाबासाहेब सोनवणे, मा.सौ.छाया सुरेश तिवारी, मा.सौ.सुनिता फुलसौंदर, मा.श्री.दिलीप सातपुते, यांचे दिनांक १६/०७/२०१८ चे पत्र.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** १) सर्व गाळेधारक यांचा दि.१६/०७/२०१८ चे पत्र.

२) श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे, सभागृहनेता, अहमदनगर महानगरपालिका यांचे मा.विशेष सर्वसाधारण सभा बोलविणे बाबत पत्र.

३) केडगांव, जुनादाणेडबरा, रंगभवन, गंजबाजार यांचे वेळोवेळी आलेले पत्र.

४) मा.पदाधिकारी यांनी वेळोवेळी भाडेवाढीबाबत केलेले पत्र व्यवहार.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या गाळयाला अवाजवी भाडेपट्टी देण्यात येवुन कार्यवाही केली जात आहे. नगर शहरात एकुण ८८४ गाळेधारक आहेत अनेक वर्षापासुन आम्ही या ठिकाणी व्यवसाय करीत आहेत. आमचे प्रपंच याच व्यवसायावर अवलंबुन आहे. काही गाळे रस्त्यालगत व काही गाळे अंतर्गत भागात आहे. त्यामुळे सर्वच गाळेधारकांना उत्पन्न मिळते असे नाही अवाजवी भाडेवाढ आम्हास मान्य नाही. महानगरपालिकेने गाळेधारकांना घरपट्टी व पाणीपट्टी आकारणीकेलेली आहे. तरी भाडेवाढीबाबत आम्हाला न्याय मिळावा त्यावर मा.महापौर, अहमदनगर मनपा यांनी सदर विषयाबाबत मा.महासभेत निर्णय घेणेकामी तातडीने प्रस्ताव तयार करुन मा.महासभेकडे प्रस्ताव तयार करा असा अभिप्राय दिल्याबाबतचे दि.१६/०७/२०१८ रोजीचे पत्र इकडेस प्राप्त झाले आहे. तसेच केडगांव, जुनादाणेडबरा, रंगभवन, गंजबाजार येथील गाळेधारकांनी देखील पत्र देऊन आम्हास योग्य प्रमाणात भाडेवाढ करुन मिळावी तसेच आम्हांस खुल्या जागा देण्यात आलेल्या आहेत. ज्या व्यक्तीस खुली जागा दिली त्याने स्वखर्चाने बांधकाम करुन घ्यावयाचे होते. बांधकामाची कोणतीही जबाबदारी मनपाची नव्हती तसेच पुर्वी जे भाडे ठरले होते त्यामध्ये दरवर्षी ३% भाडेवाढ देण्याचे ठरले होते. तसेच महानगरपालिका दरम्यान व गाळेधारका दरम्यान भाडे वाढीबाबतचा असलेला वाद व सर्व बाबीचा वाद सहानुभुतीपुर्वक विचार करुन सोडवावा असे पत्रात नमुद केले आहे.

तसेच म्यु.पल शाळा क्र.१ जवळील गाळेधारक यांनी मनपाच्या भाडेवाढी विरोधात मा.न्यायालयात दावा क्र.१३८/२०१८ अन्वये दाखल केला आहे. तसेच सिध्दीबाग शॉ.सेंटर येथील गाळेधारकांनी व ग्राहक भांडार या संस्थेनी देखील मनपाच्या भाडेवाढी विरोधात मा.न्यायालयात दावा दाखल केला आहे व तो प्रलंबिआहे.

तरी मा.महासभा ठराव क्र.२० व २१ दि.३१/०८/२०१५ व मा.महासभा ठराव क्र.३७ दि.१६/०३/२०१६ मधील ठरावात अहमदनगर शहरातील प्रोफेसर कॉलनी शॉपिंग सेंटर वगळुन सर्व शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या गाळेधारकांचे कडुन नुतनीकरण करतेवेळी सद्याचा गाळेधारक नुतनीकरण करीत असल्यास रेडीरेकनप्रमाणे भाडे व सहा महिन्याच्या भाडे इतकी रक्कम डिपॉझिट/ अनामत घेण्यात यावी तसेच पोट भाडेकरी गाळेधारक अथवा नवीन गाळेधारक यांस गाळे देतांना रेडीरेकनरप्रमाणे भाडे व एक वर्षाच्या भाडे इतकी रक्कम डिपॉझिट/ अनामत घेण्यात यावी करार रजिस्टार ऑफीस समोर करावे. असा ठराव पारीत झाल्यानुसार मा.नगररचनाकार यांचेकडुन सदर ठिकाणचे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ "ड" नुसार रेडीरेकननुसार भाडे ठरवुन घेवुन त्यानुसार संबंधीत ५६३ गाळेधारकांना करार करणे बाबत व गाळे हस्तांतरण करणे बाबत नोटीसा देवुन कळविण्यात आले होते परंतु अद्यापपावेतो एकाही गाळेधारकाने करारनामा केलेला नाही. तसेच गाळा हस्तांतरण केलेला नाही. त्यामुळे मार्केट विभागाकडील थकबाकीमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. रेडीरेकनर ठरावानुसार संबंधीत गाळेधारकांचे दि.०१/०९/२०१५ पासुन झालेली भाडेवाढीच्या नोंदी टाचण रजिस्टरला घेतल्या असुन त्यानुसार बिले व नोटीसा वाटप करण्यात आलेल्या आहेत. वसुलीसाठी कर्मचारी गेले असता गाळेधारक जुन्या दराने पैसे भरत आहे. नवीन दर आम्हांस मान्य नाही आम्ही वेळोवेळी पत्र व्यवहार करीत आहेत. तसेच याबाबत मा.आयुक्त, मा.आमदार, मा.महापौर, मा.मुख्यलेखापरीक्षक व सर्व पदाधिकारी व गाळेधारक यांच्या समवेत वेळोवेळी बैठका झाल्या त्यानुसार मा.आयुक्त यांचे सुचनेनुसार प्रस्ताव तयार करुन मार्केट विभाग जा.क्र.१०२ दि.०७/०६/२०१८ रोजीचे पत्र देवुन मा.महासभा ठराव क्रमांक ३७ दि.१६/०३/२०१६ अन्वये लागु असलेल्या रेडीरेकनरनुसार भाडेमुल्य करण्यात आलेले असुन सदरचे भाडे कमी करणे नियमानुसार शक्य नाही तरी उपरोक्त बाबत नियमानुसार कार्यवाही आपल्या कार्यालयामार्फत करणे योग्य राहील असे विभागाचे तम आहे. असा अभिप्राय दिला आहे. मा.महासभेमध्ये झालेल्या ठरावानुसार मा.सहा.संचालक, नगररचना मनपा यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार भाडेमुल्य ठरवुन दिले असल्याने मार्केट विभागामार्फत नियमानुसार गाळाभाडे वसुली सुरु आहे. व ती योग्य आहे.

तरी सदरची बाब ही धोरणात्मक असल्याने वरील सर्व बाबींचा विचार करता व रेडीरेकनर दरवाढीबाबत मा.महापौर यांनी दि.१६/०७/२०१८ रोजीच्या पत्रावर आदेशीत केल्यानुसार तसेच मा.सभागृह नेता यांचे दि.१६/०७/२०१८ चे पत्रानुसार सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव सादर करणेस रिपोर्ट आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक आयुक्त श्री.तडवी एस.बी.यांचा अभिप्राय की, प्रस्तावात नमूद केल्यानुसार पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) श्रीमती.कावरे यांचा अभिप्राय की, (१) मार्केट विभाग प्रमुख यांनी सादर केलेल्या उपरोक्त अहवालानुसार, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ (क)(ड) नुसार महानगरपालिकेच्या मालमत्तेचे भाडेमुल्य चालू बाजार किमतीनुसार वसूल करणे आवश्यक आहे.

(२) त्यानुसार सहाय्यक संचालक नगररचना यांनी ठरवुन दिलेल्या बाजार मूल्यानुसार संबंधित गाळेधारकांकडून होणारी भाडे वसूली योग्य आहे.

(३) त्यामुळे संबंधित गाळेधारकांचा अर्ज दि.१६/०७/२०१८ मध्ये मागणी केलेप्रमाणे भाडेपट्टीमध्ये दुरुस्ती करणे अथवा कमी करणे योग्य होणार नाही. तसा अहवाल सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून प्राप्त आहे. (४) सोबत शा.नि. दिनांक २१ नोव्हेंबर २०१६ नगरविकास विभागची प्रत सादर आहे. सदर शा.नि.मध्ये कोल्हापूर म.न.पा.चा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ (क) व (ड) चे उल्लंघन करणारा तसेच महापालिकेचे आर्थिक नुकसान करणारा, ठराव अंतिमतः विखंडीत केला आहे.

(४) उपरोक्त शा.नि. दिनांक २१/११/२०१८ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९. कलम ७९ (क) व (ड), मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल सहाय्यक संचालक नगररचना यांचे दि.०५/०७/२०१८ रोजीचे पत्र यांचे अवलोकन होवुन उचित निर्णयास्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त श्री.विलास वालगुडे यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालामधील पान क्र. टी-१ व टी-२ वरील A व B प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच उपायुक्त (कर) यांनी अनु.क्र. १ ते ५ प्रमाणे मान्यतेस्तव प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणे उचित होईल.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त श्री.राहुल व्दिवेदी साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर मॅडम यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे प्रस्ताव सादर करा.

**चर्चा :-**

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** आजच्या सभेला अधिकारी हजर नाहीत स्थायी समितीतही आम्ही ही चर्चा उपस्थित केली सर्वांना मिटींगची विषय पत्रिका दिली आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आयुक्त सा़े, आज उपस्थित नाही त्यांचा चार्ज वालगुडे सा़े यांचेकडे दिला आहे का.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :-** मा.आयुक्त सा़े निघाले आहेत तोपर्यंत मा.महापौर मॅडम यांनी मला आयुक्त सा़े यांचे जागी बसणे बाबत सूचना दिल्या आहेत.

**मा.महापौर मॅडम :-** मी त्यांना सूचना दिल्या आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आतापर्यत अधिकारी हजर नाहीत. जे अधिकारी हजर नाहीत त्यांचेवर कारवाई करा.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त श्री.राहुल व्दिवेदी साहेब :-** विशेष सभा आहे विशेष सभेस संबंधीत विभाग प्रमुख उपस्थित राहतील.

**मा.श्री.संजय घुले :-** प्रथम श्रंध्दाजलीचा विषय घ्या. शहरातील नामवंत पदाधिकारी व्यक्ती यांचे निधनानिमित्त सर्वांना श्रध्दांजली वाहिली.

विषय वाचन करण्यात यावे. त्यानंतर प्रस्ताव वाचन करण्यात आले.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** अहमदनगर महानगरपालिका होण्यापुर्वी नगरपरिषद असतांना महानगरपालिकेचे बायलॉज तयार करणे व शासनाकडे पाठवुन मंजूरी घेवून त्यानुसार महानगरपालिकेचे काम करणे आवश्यक होते ते झालेले नाही. सर्वप्रथम महानगरपालिकेचे उपविधी तयार करावेत शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावे.

महासभा ठराव करते व प्रशासन त्याची अंमलबजावणी करीत नाही. चांगला पर्याय काढला तर वसुली चांगली होईल. प्रशासन कारवाई करते पण महाागरपालिकेकडे कर्मचारी नसल्याने कारवाई होत नाही.

अनधिकृत बांधकाम संदर्भात तक्रार केल्यानंतर महानगरपालिका कर्मचारी साईटवर व्हीजीट करतो. १५ दिवसाची मुदत देवून सुनावणी घेवुन प्रक्रियेत वेळ लागतो. तोपर्यंत ते बांधकाम पूर्ण होते व कोर्टात प्रकरण जाते. तेथेही आपले वकील लक्ष देत नाहीत.

पांजरापोळ बांधकाम संदर्भात बांधकाम पाडायला २०१३ साल उजाडले. छोटया गाळे धारकांवर दरोडे घातले जातात. महानगरपालिकेच्या जागेत कृषी उत्पन्न बाजार समितीने महानगरपालिकेच्या जागेवर गाळयांचे बांधकाम करुन उत्पन्न घेत आहेत. त्या संचालकांवर गुन्हे दाखल का करीत नाही. कोंडवाडयाच्या जागेवर गाळे बांधकाम करुन विक्री केली आहे. सुलभ शौचालयाच्या जागी बांधकाम केले आहे.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त श्री.राहुल व्दिवेदी साहेब :-** गाळे धारकांच्या भाडे संदर्भात सध्याचा मुद्दा आहे त्या संदर्भात बोलावे.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** महानगरपालिकेच्या जागेवर गाळे संबंधी कोर्टात मॅटर गेले त्यासाठी ठोस कार्यवाही करणे गरजेचे आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** गाळे धारकांचे संदर्भात मा.विशेष सभेचे आज आयोजन करण्यांत आले आहे. ८८४ गाळे धारक आहेत. टिपणी आहे. ८८४ गाळे कोणत्या एरियात किती गाळे आहेत या संदर्भात माहिती देण्यांत यावी.

**श्री.वैभव जोशी :-** यादी नगररचना विभागाकडे उपलब्ध नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** गाळयाच्या ठिकाणांची माहिती माझेकडे नाही, असे उत्तर नगररचना विभागाचे अधिकारी देतात. भाडे ठरविण्याचा अधिकार नगररचना विभागाचा आहे.

गाळयाचे फेर सर्व्हेक्षण झालेच नाही. नगररचना ऑफिसमध्ये बसुन हे काम झाले आहे. गाळे धारकांचे ठिकाणे जर टीपीला माहिती नाही. मग हा सर्व्हे कसा झाला. सर्व्हे चुकीचा झाला. सर्व्हे पुन्हा करावा. कापड बाजाराचे मुल्यमापन केले व त्यामागील जागेत गाळयांना पण मुख्य रस्त्यावरील हाच दर लागू केला. हा फरक आहे. पुनःश्च सर्व्हे करावा. तुम्ही त्यांना नोटीस बजविल्या. चितळेरोड वर वडया वाल्याला १०००/- रुपये भाडे त्यावरील गाळे धारकाला ३ वर्षात ७ लाख रुपये भाडे आले आहे. महानगरपालिकेचे उपविधी तयार व्हायला पाहीजे ती अद्याप मंजूर नाही. उपविधी मंजूर नसतील तर रेडीरेकनर नुसार कशी आकारणी करता. या संदर्भात गांभीर्याने विचारात घ्या.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ८८४ पैकी काही गाळे चालत असतील. मागे सन २०१५ ला ठराव झाला त्यामध्ये प्रोफेसर कॉलनीचे गाळे वगळण्यांत आले. ते गाळे का वगळले. परवा स्थायी समिती सभेत उपायुक्त यांनी दोन्ही ठराव वाचून दाखवले. उर्वरीत लोकांवर अन्याय का करायचा. यांनाही सर्वांना वगळण्यांत यावे.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** महासभा ठरावानुसार अंमलबजावणी करण्यांत आली आहे. एफबीटी तत्वावर प्रकल्प डेव्हलप करायचा असा प्रस्ताव प्रस्तावीत आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सर्व्हे व्यवस्थीत करा. शिवसेना गाळयांना अजिबात सील ठोकू देणार नाही.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** दिनांक ३१/०८/२०१५ ला महासभा झाली. जवळजवळ सर्व ६५ नगरसेवक उपस्थित असतील. प्रोफेसर कॉलनी संकुल संदर्भात चर्चा झाली. सर्व अधिका-यांकडून प्रक्रीया संपली होती. ही सभा ज्यावेळेस घेण्यात आली त्यावेळेस सविस्तर चर्चा झाली. बीओटी किंवा एफबीटी तत्वावर एखादा चांगला प्रकल्प होत असेल तर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती आपणांस माहिती आहे. एफबीटी तत्वावरील प्रोजेक्ट जर शासनाकडे गेला असता तर शासनाकडे तसे कळविण्यांत आले. सभागृहातील चर्चेनुसार ठराव अंतीम होत असतो. राष्ट्रवादी कॉंग्रेसतर्फे दुटप्पी भुमिका घेण्यांत येत नाही. सभागृहात त्यावेळी

सर्व नगरसेवक उपस्थित होते. त्यांनी विरोध लेखी दर्शविला पाहीजे होता. विरोध मौखिक दर्शविला आहे. गाळे धारकांना न्याय मिळाला पाहीजे. सर्वांना हे माहिती आहे. गाळेधारक तुमचे आमचे नाही. गाळे धारकांवर अन्याय घडू द्यायचा नाही.

**मा.श्रीमती.मनिषा बारस्कर :-** भाडे ठरविण्यांत आले त्याचे लोकेशन काय, काही गाळे मागच्या साईटला असतात त्यांना सरसकट भाडे आकारले आहे. त्याचे व्यवस्थीत व्हॅल्युएशन करुन भाडे ठरवा. काही गाळे २० वर्षापुर्वीचे  आहेत त्यांचा घसारा ठरविण्यांत आला का. ३० टक्के घसारा धरुन भाडेवाढ केली का. इमारतीचे वय, परिसर, पहिला मजला, दुसरा मजला याबाबी विचारात घेवून भाडे ठरविण्यांत यावे.  घसारा धरला आहे का.

**श्री.वैभव जोशी :-** धरला आहे. रेडीरेकनर नुसार केले आहे. पहिला मजला व दुसरा मजला धरुन आकारणी करण्यांत आली आहे.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** इमारतीचे आयुष्य किती असेल त्याचे आयुष्य पाहून भाडे मुल्य ठरविण्या बाबत रेडीरेकनर मध्ये नमूद आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** फेर सर्व्हे करा.

**मा.श्रीमती.मनिषा बारस्कर :-** फेर सर्व्हेक्षण करावे गाळे धारकांना परवडेल असे भाडे आकारावे असे गाळेधारकांचे म्हणणे ऐकावे.

**मा.सभागृह नेते श्री.गणेश कवडे :-** गेल्या अनेक वर्षापासुन शहरात व्यापारी कुटुंब वास्तव्यास आहेत. बाहेरगावाहून व्यापारी येथे येतात. बाजारपेठ उध्वस्त झाली नाही पाहिजे.मा.अनिल शिंदे, मा.अभिषेक कळमकर साहेब यांचे चर्चेत जे प्रोफेसर कॉलनी गाळे संदर्भात चर्चा झाली. तुमचा माझा विषय न होता आपण सर्व पक्षीय गाळे धारकांच्या मागे उभे राहीले पाहीजे विधायक कामासाठी आपण सर्वजण एकत्र येवून त्यांच्या पाठीशी उभे रहा. सर्व्हे पुर्णपणे चुकीचा झाला आहे. फेर सर्व्हेक्षण तुमच्या अधिकारात पुन्हा करण्यांत यावा. अनधिकृत धार्मिक स्थळांचा सर्व्हेही आपल्या अधिका-यांनी टेबलवर बसुन केला आहे. काही लोकांनी पुरावे दिले त्यामुळे काही धार्मिक स्थळे कारवाईच्या यादीतुन वगळण्यांत आले. गाळे धारकांचा चुकीचा सर्व्हे कुणीही खपवुन घेणार नाही.  संपुर्ण सभागृहाची विनंती फेर सर्व्हे करण्यांत यावा.

**मा.विरोधीपक्ष नेता श्री.बाळासाहेब बोराटे :-** आज जो गाळयांचा विषय सभेत चर्चा चालू आहे. ज्याप्रमाणे नेहरुमार्केटचे मूल्य काढतांना बिल्टींग पध्दतीने आकारणी केली त्याप्रमाणे याठिकाणी बिल्टींग पध्दत वापरण्यांत यावी. जीएसटी लावण्यांत आली ते योग्य आहे का.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** जीएसटी लावण्यांत आली ते योग्य आहे. बिल्टींग मेथड जमिनीच्या बाबतीत वापरता येते.

**मा.विरोधीपक्ष नेता श्री.बाळासाहेब बोराटे :-** बांधकाम न करता मोकळया जागा ज्यांना दिल्या त्यांना रेडीरेकनर नुसार आकारणी करता येते का. रेडीरेकनर दर कमी करता येतो का ?

**नगररचनाकार श्री.पाटील :-** त्याकरीता आयजीआर यांना विनंती करावी लागेल.

**मा.विरोधीपक्ष नेता श्री.बाळासाहेब बोराटे :-** तसा ठराव करा. गाळेधारकांना बिलात  शास्ती लागली. त्यांचे कोर्ट मॅटर असल्याने महानगरपालिकेने शास्ती ७५ टक्के शास्ती माफीचा लाभ त्यांना घेता आला नाही. शास्ती माफी करुन कर भरण्यासाठी ८ ते १० दिवसाचा रिलीफ देण्यांत यावा. गाळे भाडयाचा विषय मा.शासनाकडे पाठवावा. शास्ती माफीचा आपणांस अधिकार आहे.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त श्री.राहुल व्दिवेदी साहेब :-** शास्ती माफी यापुर्वी दिली आहे. त्यासाठी करदात्यांना त्याची माहिती होण्यासाठी अगोदर १५ ते २० दिवसापासुन भुमिका घेतली आहे. आपण जर संधीचा फायदा घेतला नाही तर प्रशासन कारवाई करेल असे जाहीर निवेदन प्रसिध्दीस दिले आहे.

**मा.सौ.छाया तिवारी :-** सिध्दार्थनगर मधील गाळयांचे फेर सर्व्हेक्षण करा. सदरचा भाग स्लम एरिया मधील आहे. लोकेशन वाईज फेर सर्व्हेक्षण करावे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** पुर्वीचा जो विषय मंजूर करण्यांत आला तसाच ठराव कोल्हापूर महानगरपालिकेने केला तो मा.शासनाने विखंडीत केल्याची बातमी वृत्तपत्रातुन वाचनात आली. गाळे धारकांच्या खुषीसाठी विषय घेवू नका हा जर ठराव केला तर मा.राज्य शासनाकडुन किंमत करुन आणावी आम्ही तुमच्या बरोबर यायला तयार आहोत पण विषय पेंडींग ठेवू नका.

**मा.श्री.संजय घुले :-** आयुक्त साहेब व जिल्हाधिकारी साहेब योगायोगाने एकच आहेत. वसुली मोहिमेचे प्रशासनाने केलेल्या कार्यवाही बद्दल अभिनंदन करतो. एकुण ८८४ गाळे आहेत. त्यामध्ये काही ठिकाणी खुल्या जागा देण्यात आल्या. शाळा खोल्या भाडयाने देण्यांत आलेल्या आहेत. त्यांचे भाडे थकले आहेत. वाडियापार्क क्रीडा संकुलातील गाळयांबाबत निर्णय घेण्यांत यावा. त्यांना गाळे खाली करायला सांगीतले आहेत. महानगरपालिकेचे उत्पन्न घटणार आहे. ८८४ गाळयांपैकी अनेक गाळे आज पडक्या अवस्थेत आहेत. सबजेल चौका जवळील गाळे नालीवर बांधले आहेत. त्यांची दुरावस्था झाली आहे. भाडे आकारतांना प्रत्येक शॉपिंग सेंटरचे मुल्यमापन करावे. गाळा कोठे आहे. गाळयाची अवस्था पहावी. वस्तुस्थिती पहावी. प्रोफेसर कॉलनी शॉपिंग सेंटर गाळेधारकांचे भाडे वाढीचा विषय आला होता. महानगरपालिकेच्या हितासाठी काही निर्णय घेणे गरजेचे होते त्यामुळे ते शॉपिंग सेंटर वगळुन निर्णय घेतला. मा.शासनाने टेंडर प्रोसेस पुढे करायला सांगितले आहे. ज्या जागेवर आहे. त्या जागेवर गाळेधारकांचे पुनर्वसन करा. तुम्हाला काय नविन करायचे ते करा. सर्व महानगरपालिकेचे शॉपिंग सेंटर वाईज सर्व्हेक्षण करा. शासनाचा एक अधिकारी नेमा त्याचे हाताखाली आपले कर्मचारी द्या.

विक्रीचा सुध्दा रेट ठरवायला पाहीजे. हस्तांतरण फी ठरली पाहीजे. एका गाळयाचे चार - पाच मालक बदलले पण आजही रेकॉर्डला मुळ मालकाचेच नाव आहे. स्थायी समिती महासभेला किती वर्षांनी करार करायचा अधिकार आहे. त्या कायद्यातील तरतुदीनुसार लागू करा. तोच मसुदा प्रत्येकाला लागू झाला पाहीजे. रेडीरेकनरच्या दुरुस्तीचा ठराव लागू करा. आगरकर साहेबांनी मागील बैठकीत तुम्ही ठराव करा. आम्ही शासनाकडुन मंजूर करुन आणतो शासन आमचे आहे असे सांगीतले.

**मा.श्री.सचिन जाधव :-** गोरगरीब गाळे धारक आहेत. नगर शहरात वेगवेगळे विषय असतांना गाळे धारकांचा विषय चर्चेला पुढे का येतो. आपण गाळे धारकांना नोटीसा पाठवल्या त्याच्यावर गेल्या आठ ते दहा वर्षापासुन नोटीसची टांगती तलवार आहे. रेडीरेकनर कशासाठी वापर करतो.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** प्रत्येक गोष्टीसाठी वापर केला जातो.

**मा.श्री.सचिन जाधव :-** रेडीरेकनर स्टॅम्पडयुटीसाठी वापर केला जातो.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** मा.शासनाने सुचना दिलेल्या आहेत त्यानुसार कार्यवाही करण्यांत येते.

**मा.श्री.सचिन जाधव :-** कोणत्या कायद्यात रेडीरेकनरनुसार या गाळेधारकांकडुन आकारावे असे नमुद आहे.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** महानगरपालिका कायद्यात तरतुद आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९ (ड) मधील तरतुदींचे वाचन केले.

**मा.श्री.सचिन जाधव :-** चालू बाजार मुल्याचा अर्थ रेडीरेकनर असा होत नाही.

**नगररचनाकार श्री.पाटील :-** रेडीरेकनरचे नांव बाजारमुल्य दर तक्ता असे आहे. रेडीरेकनर शब्द आपण चुकीने वापरतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कोणत्याही जागेचे मूल्यच ठरलेले नाही.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त श्री.राहुल व्दिवेदी साहेब :-** दोन खाजगी व्यक्तींचे ट्रान्झक्शन असेल तर मा.शासनाचे जागेवर कुठल्याही व्यक्तीचे ट्रान्झक्शन असेल तर आम्ही रेडीरेकनरचे कमीत कमी दराने आकारणी करतो.

**मा.श्री.सचिन जाधव :-** संस्थेच्या जागा मालकाचा अधिकार आहे. जागा कोणाला द्यायची किती दराने द्यायची एखाद्या जागेचे मुल्यांकन हायवे लगत असेल, एखादा सर्व्हे नंबर एक ते दीड किलोमीटरवर असेल तर नाशिकला २० टक्के पर्यंत कमी होतात. ॲडज्युडीकेशनला टाकण्याचे अधिकार आहेत. नगरविकास कडे दाद मागण्याचा अधिकार आपणांस असतो. उदा :- एका प्रकरणात मा.शासनाने जर दोन कोटी रेडीरेकनर दर लावलेला आहे. त्यांचेकडुन १५ ते १६ लाखापर्यंत दर कमी करण्यांत आला. सर्वांत महत्वाचा प्रश्न रेडीरेकनर हा आपल्याला बंधनकारक नाही. आपण सेवा देणारी संस्था आहोत. याठिकाणी दोन हजाराचा भाडे करार झाला तर त्याला आकारणी केली जाते. आपण जेंव्हा एखाद्याला मिळकत भाडयाने देतो. आपसातील जो करार होतो. तो आपण रजिष्टर्ड करुन देतो. रेडीरेकनरचा इशू फक्त स्टॅम्प डयुटीसाठीच आहे. महानगरपालिकेत सर्वोच्च अधिकार मा.महासभेला दिले आहेत. महानगरपालिकेचा सेवा देण्याचा उद्‌देश आहे. हे शहर आपले आहे. नवनीतभाई बार्शीकर नगराध्यक्ष असतांना या शहरात व्यापारी पेठ वसावी या उद्देशाने अशा ठिकाणी गाळे बांधण्यात आले की या ठिकाणी कोणी येत नव्हते. बाजार पेठ डेव्हलप होण्यासाठी बराच काळ गेला. मंगलगेट मध्ये बैलगाड्याने माल आणायचे तेथे गाड्या सोडून माल विकायचे. तेथील व्यापारी तात्कालीन नगराध्यक्षांकडे गेले व आम्हाला तेथे जागा द्या अशी मागणी केली त्यावेळी तात्कालीन नगराध्यक्षांनी नॉमीनल दर आकारणी करुन त्यांना जागा दिली. ६० सालापासुन त्याठिकाणी व्यापारी व्यापार करतात. आज ते ठिकाण सोडुन दुस-या ठिकाणी जावुन ते काम करु शकत नाही. आपण त्यांना ती जागा सोडा हा नैसर्गिक न्याय होवू शकत नाही. १९६० पासुन दरवर्षी ३ टक्के भाडेवाढ प्रमाणे येणारी पट्टी ते भरत होते. गाळे त्यांनी स्वखर्चाने बांधले आहेत. त्यांना बांधकामा प्रमाणे आकारणी केली आहे. त्यांना रेडीरेकनर लागू होत नाही.

**मा.श्री.शेख नजीर अ.रज्जाक :-** ज्याचा ताबा आहे त्यांनाच द्या. काही लोकांनी हे गाळे भाडयाने दिलेले आहेत. मालकही येत नाही. भाडेक-याला म्हणतो तूच पहा.

**मा.श्री.सचिन जाधव :-** सर्जेपुराचे सुध्दा गाळे ओटे म्हणुन १९७२ मध्ये दिले. त्यानंतर ओटे धारक व नगरपरिषद यांच्यात कोर्ट मॅटर झाले. त्याचा निकाल ओटे धारकांचे बाजुने झाला. पुर्वीचे ॲग्रीमेंट नष्ट झालेले नाही ते आजही अस्तीत्वात आहे. गाडगीळ पटांगण, अमरधाम, चितळेरोड व इतर वरिल ओपन जागांना त्याच पध्दतीने भाडे लागले पाहीजे. मोकळया जागेचे भाडे घेतले पाहीजे.

**श्री.वैभव जोशी :-** मोकळया जागा दिल्या असतील तर मोकळया जागेचे भाडे लागले पाहीजे. मार्केट विभागाकडुन गाळयाचे भाडे अपेक्षिलेले होते. त्यानुसार ते दिले. जागेवर पाहणी करुन भाडेमुल्य ठरविले पाहीजे. ओटे दिले असतील तर त्यानुसार दुरुस्ती केली जाईल.

**मा.श्री.सचिन जाधव :-** मोकळया जागानुसार भाडे आकारणी करावी. आजही कोर्ट मॅटर चालू आहे. कोर्टात निर्णय होत नाही तोपर्यंत कारवाई करु नाही.

**श्री.वैभव जोशी :-** महानगरपालिका ठराव क्रमांक ३७ दिनांक १६/०३/२०१६ नुसार कार्यवाही चालू आहे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** सन २०१० ला ठराव केला त्याची अंमलबजावणी का केली नाही. पहिल्या नोटीसा रद्द होतील. जीएसटी लागू होत नाही. घरपट्टी व पाणीपट्टी ॲग्रीमेंट मध्ये ठरेल. कोणत्याही गाळे धारकाला घरपट्टी आली नाही. पुर्वीच्या गाळे धारकांचे ॲग्रीमेंट मध्ये नोंद झालेली नाही. बाजारमूल्य अत्यंत चुकीचे ठरविले आहे. स्लम भागात गाळा असेल तर भाडे कमी करता येते. दुरुस्तीचा अधिकार नगरविकास विभागाला आहे. रेडीरेकनर च्या चुका दुरुस्ती व्हाव्यात फेरप्रस्ताव ज्या दिवशी शासनाकडुन ठरवुन येईल त्यावेळी आम्ही भाडे भरण्यास तयार आहोत. तोपर्यंत या नोटीसा रद्द कराव्यात.

**मा.श्री.गणेश भोसले :-** सन २०१५ मध्ये ठराव झाला पहिल्या ठरावाचे काय झाले. तो ठराव रद्द करण्यासाठी सभा घ्यावी लागते काय. यामध्ये राजकारण येता कामा नये. रेडीरेकनरने त्यांना पट्टी आकारण्यांत आली आहे. तुम्ही दोघांचे ऐकुण मध्य काढा. गाळेधारक आपलेच आहेत. काही गाळयांमध्ये दररोज १० हजारांचे उत्पन्न मिळते तर काही गाळयांमध्ये १०० रुपये सुध्दा धंदा होत नाही. रेडीरेकनर जर चुकीच्या पध्दतीने लागले असेल तर आपण मध्य गाठुन निर्णय घेतला पाहीजे व गाळे धारकांना न्याय दिला पाहीजे. श्रेय फक्त शिवसेनेलाच नको. राजकारणाच्या दृष्टीने विषय व्हायला नको. मागील सभेत सर्व नगरसेवकांनी रेडीरेकनर प्रमाणे द्या असे म्हणणे मांडले आहे. सीना नदीच्या कामाबद्दल मा.आयुक्त साहेब यांचे अभिनंदन करतो. गेल्या १० वर्षात वृक्ष गणना झाली नाही मी ब-याच वर्षापासुन ही मागणी करीत आहे. परंतु त्यावर कार्यवाही झालेली नाही.

**मा.महापौर मॅडम :-** विषयांतर होत आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मा.आयुक्तांच्या अभिनंदनाचा ठराव मी या ठिकाणी मांडतो. प्रशासनाने वेळोवेळी कशा चूका केल्या त्या मी या ठिकाणी मांडतो. दिनांक ३०/०६/२००३ ला महानगरपालिका अस्तित्वात आली. त्यावेळी प्रशासकीय ठराव करतांना देवरा साहेबांनी प्रशासकीय ठराव नंबर १६ अन्वये ३० वर्षाचे करारनामे करुन दिले आहेत. मी त्याचे पुरावे देतो. मुद्दा क्रमांक २, ३० हजार रुपये व ६० हजार रुपये अनामत रक्कम भरुन गाळे हस्तांतरणा बाबत ठराव झालेला आहे. २००३ पासुन गाळेधारकांचा विषय चाललेला आहे. याबाबत सन २००३ साली सन २००६, २०१३, २०१४, २०१६ ला वेळोवेळी ठराव झाले. त्याची अंमलबजावणी झालेली नाही. २०१३ चा ठराव हा विखंडीत होतो. २००३ चा ठराव अस्तित्वात राहतो हे कसे. २०१३ चा विखंडीत केला त्यानंतर पुन्हा २०१५ ला ठराव केला ठराव कोणता अंमलात आणणार. मार्केट विभागाने जागेचे दर ठरविणे बाबत दोन वर्ष लागत असतील तर दोष कोणाचा. स्थायी समितीच्या माध्यमातुन कमीत कमी तीन व जास्तीत जास्त ११ वर्षे कराराने गाळे दिले जातात. करार करुन घेण्याची जबाबदारी प्रशासनाची होती. ते अद्याप झालेले नाही ही दुर्दैवी बाब आहे. ८८४ गाळे आहेत तुम्ही म्हणता दुसरीकडे ८५३ ला भाडे वाढ करायची बाकीचे गाळे कोणते त्याबाबत माहिती द्या.

**मा.श्री.कैलास भोसले :-** कराराची मुदत न संपलेल्या गाळयांबाबत माहिती-

सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज-१ , ३२ गाळे २ हॉल,

सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज-२ , २१ गाळे ८ हॉल, ८६ भाजी ओटे

प्रोफेसर कॉलनी - ४७ गाळे

आनंदऋषीजी व्यापारी संकुल - ६ गाळे १२ हॉल

**मा.श्री.दिप चव्हाण :-** २० व २१ नंबर वगळलेले नाही. भावनाशील विषय वेगळा, किती वर्षाचा करार झालेला आहे.

**श्री.कैलास भोसले :-** ३० वर्षाचा करार झालेला आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पहिले सर्व्हेक्षण केले त्यावेळी ७२ गाळे आढळले. दुस-या सर्व्हेक्षण करतांना १७८ गाळे आढळले. तिस-या सर्व्हेक्षणामध्ये ३२५ गाळे आढळले आहेत. ज्यांच्या करारनाम्यामध्ये फरक आहे. दिनांक १६/०३/२०१६ जो ठराव झाला. सर्जेपुराचे गाळयांचा करार करतांना ११ वर्षाचा करार शासनाकडे पाठवा असा झालेला आहे.

**श्री.कैलास भोसले :-** दिनांक १६/०३/२०१६ चे वाचन करण्यांत आले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सन १९९०-१९९१ ला एक ठराव झालेला आहे. यांनी इतका गोंधळ केलेला आहे. २६ गाळे सिध्दीबागे समोरचे आहेत. २०१६ पासुन रेडीरेकनरचे भाडे आकारले. २०१४ च्या ठरावामध्ये प्रशासन म्हणते गाळयांचे नगररचना विभागाने भाडे ठरवुन दिलेले नाही. सन २००३, २०११, २०१०, २०१३, २०१५, २०१६ साली गाळे धारकांबाबत सभेत ठराव झाले. कळमकर साहेब असतांना ८१ ब च्या नोटीस रद्द करण्यांत याव्यात व श्रीमती.शिला शिंदे यांचे काळातही ठराव करण्यांत आलेला आहे.

**श्री.कैलास भोसले :-** वसुलीची कार्यवाही थांबली होती. गाळयाची मुदत संपली त्यावेळी ८१ ब च्या नोटीसा दिल्या होत्या.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** कळमकर साहेब यांचे महापौरांचे कारकिर्दीतील ठरावाचे वाचन केले. सर्व साधारण सभा ठराव क्रमांक ५३ रोजी झालेल्या ठरावास अधिन राहुन रेडीरेकनर नुसार आकारणी करावी. करारनाम्या बाबत मा.शासनाकडे पत्र व्यवहार करावा. असा ठराव झालेला आहे. करारनाम्याबाबत मा.शासनाकडे पत्र व्यवहार केला का माहिती द्या.

**श्री.कैलास भोसले :-** हा विषय माझे विभागाचा नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ठराव क्रमांक ३९ मध्ये लिहीलेले आहे.

**श्री.कैलास भोसले :-** सर्जेपुरा रंगभुवन एफबीटी तत्वावर विषयाबाबत टी.पी. चा विषय आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** कारवाई करु नये असा ठरावात उल्लेख आहे. ठरावाचा हा अपमान नाही का. त्यावेळी १९६५ चा नियम होता आता महानगरपालिका अधिनियम आहे. डिमांड नोटीस दिल्याशिवाय भाडे वसुल करता येत नाही. मागच्या ठरावाकडे प्रशासन लक्ष देत नाही. त्या ठरावाची अंमलबजावणी होत नाही. भाडे कमी करायचे कोणते कमी करायचे ऑफिसचा रिपोर्ट येतो. चुकीचा ठराव केला तर रिकव्हरी आमची होईल. आयुक्त साहेबांनी कालच ठरावाचे अंमलबजावणी बाबत पत्र काढले आहे. विषय तुम्ही घेता चुकले तर त्याची रिकव्हरी नगरसेवकांकडुन होते हे होता कामा नये. रेडीरेकनर संदर्भात एक कायदा आहे. सिध्दार्थ नगर, स्वास्थ्य हॉस्पीटल शेजारील रोडला १४ हजाराचा रेट लावलेला आहे. त्याचे आतमध्ये ७० मीटर अंतरावर आत स्लम भाग आहे. या मुख्य रस्त्याचा रेट आतील गाळयांना कसा लावता येईल. स्लमचा रेट दोन ते तीन हजारांचा आहे. दुसरे उदाहरण माळीवाडयातील गाळयांचे या गाळयांना एम.जी. रोड वरील रेडीरेकनरचा रेट लावलेला आहे. दाणेडबरा येथील गाळयांना एम.जी.रोडचा रेडीरेकनरचा रेट कसा लावता येईल. अशी अनेक उदाहरणे आहेत. हा ठराव असा करा की नगरपालिकेचे उत्पन्नही वाढले पाहीजे. प्रशासनाची चूक आहे गाळेधारक भाडे भरण्यासाठी ऑफिसकडे गेले असता आपले अधिकारी हे म्हणतात आमच्याकडे ठराव आलेला नाही. मी सर्व रेकॉर्डवर बोलतो. प्रशासनाचे रेकॉर्ड माझे हातात आहे. प्रोफेसर कॉलनीचा निर्णय काय होईल तो होईल. ते वगळुन कायदा कसा होईल सर्वांना बेनीफीट मिळाला पाहीजे. तो सुध्दा चुकीचा ठराव

झालेला आहे. कालचे परिपत्रक योग्य आहे. अधिका-यांना कोर्टात तोंड द्यावे लागते. गाळे धारकांवर कारवाई करु नका महानगरपालिकेला ८१ ब हा लागूच नाही. महानगरपालिकेचे उपविधी लागू होतील मग ८१ ब लागू होईल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** नगरपालिकेच्या हयातीमध्ये आत्तापर्यंत अधिका-याला अधिकारी अधिकार प्रदान करतात. या ठिकाणी ठरावात वकीलाला पॉवर कसे डेलीगेट केले. कोणत्या तरतुदीनुसार केले. आजमितीला अशोक साबळे यांना महानगरपालिकेचे वतीने अधिकार प्रदान केले आहेत. त्यानंतर महेश पवार यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. वकीलाने पाच लाख रुपये गाळे धारकांकडुन वसुल केले. घरपट्टी व पाणीपट्टी गाळेधारकांना लावता येत नाही. ती महानगरपालिकेची प्रॉपर्टी नाही त्यांना आकारलेली रक्कम पाहीली त्यात शास्ती, घरपट्टी, पाणीपट्टीच्या रक्कमेचा समावेश आहे. आपणांकडे जो आरसा आला तो खोटा आलेला आहे. पुर्वीच्या ठरावाची अंमलबजावणी संबंधीत अधिकारी यांनी केलेली नाही. संबंधीतांवर कारवाई करा. रेडीरेकनर संबंधात नंतर निर्णय घ्या अगोदर सर्व्हेक्षण करा. गाळे धारकांनी त्यांना दिलेल्या ८१ ब च्या नोटीसचे उत्तर महानगरपालिकेस दिले. परंतु त्याचे उत्तरही त्यांना दिलेले नाही. त्यांचे म्हणणे मान्य आहे की नाही. हेही त्यांना कळालेले नाही. माझी प्रकृती ठीक नाही परंतु संस्थेच्या हिताचा विषय आहे म्हणुन मी या ठिकाणी उपस्थित आहे. ठराव कायद्याने करा. व्यवस्थीत गाळेधारकांना न्याय द्या.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** माझ्या प्रभागामध्ये इंदिरा भाजी मार्केट (प्रियदर्शनी)आहे. तिथे काय सुविधा आहेत याबाबत माहिती द्या.

**मा.महापौर मॅडम :-** विषयपत्रिकेवरील चर्चा करु. या संदर्भात मा.आयुक्त यांचेशी स्वतंत्र भेट घेवुन माहिती घ्यावी.

**मा.श्री.अभय आगरकर :-** प्रथमतः मा.जिल्हाधिकारी यांचे अभिनंदनाचा ठराव मांडतो. या संपुर्ण प्रकरणाचा अभ्यास केला असता विषय केस टू केस डिफर आहे. वेगवेगळया भागात गाळयाची परिस्थीती वेगवेगळी आहे. काही बीओटी तत्वावर आहेत. काही महानगरपालिकेने बांधलेली आहेत. खुल्या जागेवरील काही गाळे स्वतः गाळेधारकांनी बांधलेली आहेत. महानगरपालिकेचे नुकसान व्हावे अशी आमची भुमिका नाही. समांतर पातळी देवुन याचे हेअरिंग करायला पाहीजे. सर्वांना संधी दिली पाहीजे. त्यानंतर निर्णय घ्यावा काही गाळे अत्यंत जुने आहेत. टोटल सर्व्हेला जर आठरा असेल तर संपुर्ण एरियाला तोच दर लावला जातो. पाठीमागे जागा असेल तर हायवेवरील जागेचा रेट त्याला लावला जातो. नॅचरल जस्टीज, सोशल जस्टीज दिले पाहिजेत. लिगल ओपीनियन मागवा. गटनेते यांचेशी चर्चा करावी. पुन:श्च समिती बनवावी.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** फेरसर्व्हेचा आदेश देत असतांना फेर सर्व्हेक्षणापुर्वी मा.शासनाचे वेगवेगळे जी.आर. येतात. स्थळांचे सर्व्हेक्षण करतांना त्यांचेवर कंट्रोल ठेवावा. टी.डी.आर संबंधात आरक्षणाचा टी.डी.आर. जनरेट केला आहे. ऑडीटमध्ये टी.डी.आर.घोटाळा असा आक्षेप घेतलेला आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** सर्व्हेक्षण किती कालावधीत करावयाचे याची मुदत ठरवुन द्या.

**मा.श्री.सचिन जाधव :-** पुर्वी पाठविलेल्या नोटीसा रद्द झाल्या पाहिजेत. रेडीरेकनरनुसार नोटीसा आलेल्या आहेत. ॲग्रीमेंट अजुन झालेले नाही. त्यामुळे रेडीरेकनरनुसार दर गाळे धारकांना लागू होत नाहीत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** यापुर्वीच्या कोणत्याही ठरावाची अंमलबजावणी प्रशासनाने केलेली नाही. हा विषय शासनाकडे पाठवायचा नाही. २८ ऑक्टोंबर २००४ ला महाराष्ट्र शासनाने भाडे मूल्य आकारणी साठी शासन निर्णय काढलेला आहे. त्यात शासनाने भाडे आकारणी बाबत डायरेक्शन दिलेले आहे. त्यामुळे पुन्हा हा ठराव मा.शासनाकडे पाठविता येत नाही.

**मा.महापौर मॅडम :-** गाळे धारकांचे फेर सर्व्हेक्षण करण्यांत यावे. त्यानंतर रस्त्याच्या लगत असलेले व आतमधील भागात असलेल्या गाळेधारकांना त्या पध्दतीने भाडे आकारणी करावी. ज्या गाळे धारकांना मोकळी जागा दिली असेल त्यांना मोकळया जागेला भाडे आकारणी करावी. गाळा हस्तांतरणा बाबत यापुर्वी ठराव पारीत झालेला आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट व महासभेत झालेल्या चर्चेनुसार गाळेधारकांचे फेर सर्व्हेक्षण करणेत यावे. रस्त्यालगत असलेल्या गाळयांना व रस्त्यापासुन आत मध्ये असलेले गाळे यांची नोंद घेवून त्याप्रमाणे भाडे आकारणी करण्यांत यावी. ज्या गाळे धारकांना मोकळी जागा दिलेली आहे, त्यांना मोकळया जागेला भाडे आकारणी करावी. गाळा हस्तांतरणा बाबत यापुर्वी ठराव पारीत झालेला आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.गणेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.